<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा यांच्या न्यायालयात</u>

**नि.फौ.ख.क्र.२८/२०२२** **निशाणी क्र. ११**

## <u>दोषारोप</u>

मी, आर. ए. मिसाळ, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा याद्वारे दोषारोप ठेवतो की, तुम्ही –

१) **तुकाराम महादेव पिवडतकर,**
वय – ५० वर्ष, धंदा – शेती,

२) **सुरेश तुकाराम पिवडतकर,**
वय – २४ वर्ष, धंदा – शेती,

३) **विशाल तुकाराम पिवडतकर,**
वय – २२ वर्ष, धंदा – मजुरी,
सर्व रा. जिगांव नवे, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

दिनांक २०/११/२०२१ रोजी ०१.३० वाजेच्या सुमारास, सुकळी, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव खा. येथे तुम्ही आरोपी क्र. १ व २ ने आरोपी क्र. १ सह आपसात संगनमत करुन फिर्यादी यांना लोखंडी रॉड व लाकडी काठी या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सह वाचन कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

२. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपी क्र. ३ ने आरोपी क्र. १ व २ सह आपसात संगनमत करुन फिर्यादी, फिर्यादीचा चुलत भाऊ व भगवान कोळी यांना लोटपाट व धक्काबुक्की करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्या अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२३ सह वाचन कलम ३४ अन्वये शिक्षापात्र अपराध केला.

वरील अपराध माझ्या कार्यक्षेत्रात घडल्याने मी त्याची दखल घेतो आणि याद्वारे मी असा निर्देश देतो की, उक्त आरोपांबाबत या न्यायालयामार्फत तुमची न्यायचौकशी होईल.

सही/–
**(आर.ए. मिसाळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – ०२/११/२०२२.

वरील तपशिलातील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला, त्यास त्यांनी नकार दिला.

सही/–
**(आर.ए. मिसाळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – ०२/११/२०२२.

– – – – –